
श्रीगणपती

# अथर्वशीर्ष





# ।। श्री गणपती-अथर्वशीर्ष ।।

अनिल सोहोनी
**चिन्मय मिशन साधक**

# मनोगत...

आज जगात सर्व ठिकाणी मान्यता पावलेला, सर्वाधिक प्रमाणात पूजला जाणारा देव म्हणजे श्री गणपती! भारतात तर प्रत्येक घरात कुलदैवत कोणतेही असले तरी गणेशाचे पूजन केले जातेच. सर्व शुभकार्यारंभी पूजला जाणारा हा ओंकाररूपी आदिदेव विघ्नहर्ता, सुखकर्ता, दु:खहर्ता व विद्येचा देव आहे. इतर देवतांचे पूजन, उत्सव यांच्या सुरवातीलाही गणेशाचेच पूजन केले जाते. ही परंपरा शास्त्रीय आहे. भारतीय संस्कृतीत हा देव एवढा एकरूप झाला आहे की, लग्न, मुंज, पूजा यात तर हा प्रथम पूजला जातो; कारण त्याच्या स्मरणाने, प्रथम पूजनाने कार्यसिद्धी होते. समर्थ रामदास स्वामी गणेशाच्या रूपाचे वर्णन करताना म्हणतात, **''गणाधीश जो ईश सर्वांगुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा।।''**

पूर्वसंस्कार, सुकृत, सद्‌गुरुकृपा व श्रीगजानन कृपा या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे जून २००४ मध्ये रोज २१ वेळा अथर्वशीर्ष म्हणतांना माझ्या मनात श्री गजाननावर अभिषेक करावा अशी इच्छा झाली. व लगेच ती अंमलात आणून रोज हे अनुष्ठान करण्यास सुरुवात केली. हे अनुष्ठान निर्विघ्न होईल व अंती त्यातून मनाची प्रसन्नता वाढेल ही श्रद्धा बाळगून ही उपासना करू लागलो.

१०-१२ दिवस नित्यनेमाने असे करत असताना लक्षात आले की केवळ नुसते वैखरीने स्तोत्र पठनाने व केवळ अभिषेक करूनही पूर्ण समाधान होत नाही. त्याक्षणी गेली तीन दशके, सद्‌गुरू प. पू. स्वामी चिन्मयानंदजी ह्यांनी, उपनिषदे, गीता व इतर प्रकरण ग्रंथांचे जे ज्ञान प्रदान केले ते आठवले आणि लक्षात आले की अथर्वशीर्षाचा मूलभूत अभ्यास करणे हे आवश्यक आहे. व सद्‌गुरूकृपेने अथर्वशीर्षाचे चिंतनरूपी लिखाण करून गजाननाची ज्ञानपूजा करावी असे ठरवले.

एक नमूद करावेसे वाटते की ह्या चिंतन रूपी टिप्पणीमध्ये माझे स्वत:चे असे काही नाही. हे सर्व आपली उपनिषदे, गीता व इतर प्रकरण ग्रंथ ह्यातील विचार असून व ते मला केवळ सद्‌गुरू प. पू. स्वामी चिन्मयानंदजी यांच्यामुळेच प्राप्त झाले आहेत. त्याचप्रमाणे सर्व संत व विद्वान भक्तांनी लिहिलेल्या वाङ्मयामधून अनेक कल्पना प्राप्त झाल्या. मी केवळ त्याचे अभ्यासपूर्वक संकलन केले एवढेच.

म्हणून सर्व थोर ऋषी, सद्‌गुरू, संतमहात्मे व विद्वान भक्त ह्यांनी पूर्वापार जी मनोहर वाङ्मयाची उपवने फुलवली त्यातील काही विचाररूपी सुंदर फुले आणून ही पूजा मी श्री गजाननाच्या चरणावर अर्पण करीत आहे. ह्या पूजेचा आनंद सर्व गजानन भक्तांना प्राप्त व्हावा हेच खरे मनोगत!

अनिल सोहोनी

**- चिन्मय मिशन साधक**

# अर्पण पत्रिका

सद्‌गुरु प.पू. स्वामी चिन्मयानंदजी यांचे चरणी

भरोनि सद्भावाची अंजुळी ।
मियां वोंविया फुलें मोकळीं ।
अर्पिलीं अंघ्रियुगुलीं ।
विश्वरूपाच्या ।

## ।। श्री गणेश विशेष ।।

| अष्टविनायक | जिल्हा प्रतिष्ठापक | देवतेचे नाव |
|---|---|---|
| १. मोरगाव (पुणे) | स्वयंभू | मोरेश्वर |
| २. थेऊर (पुणे) | ब्रह्मदेव | चिंतामणी |
| ३. लेण्याद्री (पुणे) | पार्वती | गिरिजात्मज |
| ४. ओझर (पुणे) | पार्श्वऋषी | विघ्नेश्वर |
| ५. रांजणगाव (पुणे) | शिवशंकर | महागणपती |
| ६. सिद्धटेक (पुणे) | श्री विष्णू | गजमुख |
| ७. पाली (रायगड) | भक्त बल्लाळ | बल्लाळेश्वर |
| ८. महड (रायगड) | गुत्समद | वरदविनायक |

**गणपतीची एकवीस (२१) नावे -**१.वक्रतुंड, २. कृष्णपिंगाक्ष, ३. एकदंत, ४. लंबोदर, ५. गजवक्र, ६. विकट, ७. विघ्नराजेंद्र, ८. भालचंद्र, ९. धूम्रवर्ण, १०. गणपती, ११. विनायक, १२. गजानन, १३. ओंकार, १४. मयुरेश्वर, १५.धूम्रकेतू, १६.महोदर, १७. विघ्नराज, १८. जगदीश, १९. ब्रह्मणस्पती, २०. श्री गणेश, २१. आदिदेव.

**गणपतीच्या पूजेची एकवीस (२१) फुले -** १. जास्वंदी, २. पांढरे कमळ, ३. मधुमालती, ४. जाई, ५. सोनचाफा,६.केवडा, ७. बकुळ, ८. सुपारी, ९.उंडी, १०. नागकेशर, ११.मोगरा, १२. धोतरा, १३.कण्हेरी,१४. प्राजक्त, १५. चवई, १६. नादुरकी, १७. गोविंद, १८. मोहोर, १९. शतपत्र, २०. नानाविध, २१. तांबडे कमळ.

**गणपतीच्या पूजेची एकवीस (२१) पाने -** १. दुर्वा, २. मधुमालती, ३. बोर, ४. बेल, ५. माका,६.धोतरा, ७. आघाडा ८.तुळस, ९.डोलरी, १०. कण्हेर, ११.शमी, १२.अर्जुन, १३.रुई,१४.जाई, १५.विष्णुकांत, १६. डाळिंब, १७. देवदार, १८. केवडा, १९. मोरवा, २०. पिंपळ, २१.अगस्ती.

**गणपतीने निःपात (ठार) केलेले एकवीस (२१) राक्षस-** १. नरांतुक, २.देवांतक, ३. मधू , ४.कैटभ, ५.त्रिपुरासुर ,६.सिंदरासुर, ७. व्योमासुर, ८.लोभासुर, ९.मोहासुर, १०. मदासुर,११.कमलासुर, १२.विघ्नासुर, १३.मत्सरासुर,१४. दंभासुर, १५. अनलासुर, १६.क्रोधासुर, १७. मायासुर, १८.कामासुर, १९. मेषासुर, २०. गजासुर, २१. मलकासुर.

**गणपतीची एकवीस (२१) पुराणे -** १. गणेशपुराण, २. मुद्गल पुराण, ३. ब्रह्मपुराण, ४. ब्रह्मवैवर्त पुराण, ५. अग्निपुराण, ६. पद्मपुराण, ७. पद्म पुराण उत्तर, ८. गारद पुराण, ९.शिवपुराण, १०. लिंग पुराण, ११.लिंग पुराण उत्तरार्ध, १२. वराह पुराण, १३. वराह पुराण उत्तरार्ध, १४. वामन पुराण, १५. मत्स्य पुराण, १६. क्रोधासुर पुराण, १७. ब्रह्मांड पुराण, १८, भविष्य पुराण, १९. स्कंद पुराण-ब्रह्मखंड, २०. स्कंद पुराण-अवंतीखंड, २१. स्कंद पुराण- प्रभास खंड.

**भारतातील गणपतीची एकवीस (२१) नावे -** १. ॐकार गणेश (प्रयाग), २. महोत्कट (काश्मीर), ३. विघ्नराज (आंध्र), ४. श्वेता गणेश (केरळ), ५. गणेशजी (बंगाल),६. मंगलमूर्ती (मध्यप्रदेश), ७. ढुंढीराज (काशी), ८. बद्रीगणेश (हिमालय), ९. नरक विमोचन गणेश (आसाम), १०. गणेश बर्फ लिंग (हिमालय),११. ब्रह्मगणेश (बिहार),१२. सीतामढीचा गणेश (बिहार),१३. षड्भुज गणेश (बिहार), १४. बली गणपती (राजस्थान), १५. दुर्गकूट गणेश (गुजरात), १६. खांडोळ्याचा गणेश (गोवा),१७. गोकर्ण गणेश (कर्नाटक), १८. भद्राचलम् गणेश (आंध्र), १९. कावेरीकांत विनायक (तामिळनाडू), २०. कल्पगणपती (ओरिसा), २१. विनायक (उत्तर प्रदेश).

।। श्री गणेशाय नमः ।।

।। श्री गणपती-अथर्वशीर्षम् ।।

## - प्रास्ताविक -

सुख प्राप्ती व दु:ख निवृत्ती ह्या दोन गोष्टीसाठीच प्रत्येक सजीवाची निरंतर धडपड चालू असते. अनुकूल संवेदना म्हणजे सुख व प्रतिकूल संवेदना म्हणजे दु:ख ही सुखदु:खाची व्याख्या.

मनुष्येतर योनीमध्ये मन नावाचे उपकरण विकसित झाले नसल्याने त्यांना शरीर स्तरावरील अनुकूलता हेच सुख व प्रतिकूलता हेच दु:ख असते. मानवाचे तसे नाही. मानवाला मिळालेले अंत:करण (अंतर् - आतील, करण - उपकरण, हत्यार Instrument) हे उत्क्रांत/पूर्ण विकसित आहे.

मनुष्य केवळ शारीरिक सुखसोयी मिळवून सुखी होत नाही. मनाच्या स्तरावर अनुकूल भावविश्व व बुद्धीच्या स्तरावर अनुकूल विचार विश्व प्राप्त झाले तरच मनुष्याला सुख वाटते, अन्यथा भावविश्व व विचार विश्वाची प्रतिकूलता मनुष्याला घोर दु:ख प्रदान करते.

सुख दु:खाच्या कल्पना भिन्न असतात (श्रद्धा-अमुक एका गोष्टीत, वस्तूत व्यक्तिंत, परिस्थितीत सुख वा दु:ख आहे असे वाटते) अनेक जन्मोजन्मीच्या संस्काराप्रमाणे मनाची घडण होत असते. व श्रद्धेची पण व्यक्तीगणिक भिन्नता असते.

शास्त्राने श्रद्धेचे तीन प्रमुख प्रकार सांगितले आहेत. श्री भगवान कृष्ण म्हणतात.

**त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ।**

**सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु ।।** (गीता १७/२)

ह्या मानवी देहाच्या मध्ये तीन (मुख्य) श्रद्धा, त्याच्या स्वभावाप्रमाणे असतात.

१) सात्विक २) राजसिक ३) तामसिक

त्यांच्या वर्तणुकीवरून त्या ओळखता येतात. त्यांच्या आहारविहाराच्या आवडीवरून त्याची भिन्नता कळते.

सात्विक श्रद्धा (कल्पना Attitude / values) असणाऱ्या माणसाचे वागणे/

बोलणे भिन्न असते.

सात्विक माणूस शुभ देवतांची आराधना करतो. जसे देवी, शंकर, गणपती, दत्त इत्यादी.

सात्विक माणसाचा आहार सुख, प्रेम, वाढवणारा असतो. रसमय, स्निग्ध, कसदार, ताजे शाकाहारी पदार्थ सात्विक माणसाला आवडतात.

तर राजसी श्रद्धेचा माणूस विकारयुक्त शक्तिस्थानाची आराधना करतो. ज्याच्या मनात यश, सिद्धि, पैसा प्राप्त करून घेण्याची इच्छा आहे तो शक्तिवान व श्रीमंत माणसांशी मैत्री करतो. त्यांची आराधना करतो.

राजसिक श्रद्धेच्या माणसाला चमचमीत खावेसे वाटते. तेलकट, तुपकट, अति खारट, तिखट, आंबट, दाहक पदार्थाची आवड ह्या प्रबल इच्छा अशा माणसामध्ये दिसतात.

तर तामसी माणूस भूत प्रेत पिशाच्च अथवा गुंड, वाईट वृत्तीच्या लोकांचे भजन करतो. त्याला शिळेपाके, वाळके अन्न, कुजलेले, आंबलेले उष्टे असे पदार्थ आवडतात.

श्रद्धेचा उहापोह करण्याचे कारण असे की केवळ रूची भिन्नतेमुळे प्रत्येकाचे सुख दु:ख भिन्न असते. सुख दु:खांची कल्पना अथवा स्थाने भिन्न असतात.

देवतेची आराधना प्रत्येक माणूस करतोच. फक्त ज्याची त्याची देवता त्याच्या श्रद्धेनुसार ठरत असते. सात्विक देवतेची आराधना मानवाला संकटातून मुक्त करतेच त्याचे हितच करते शिवाय त्याचे मन/अंत:करण अधिक विकसित करून त्याला ईश्वर तत्त्वापर्यंत नेते.

श्री गणपती दैवत हे सुखकर्ता दु:खहर्ता आहे ह्याचा अनुभव पुरातन काळापासून अनेकानी घेतला आहे. सर्व कार्यारंभी त्याचे स्तवन केले जाते.

गणपती अथर्वशीर्ष हे केवळ स्तुतीपर स्तोत्र नसून एक उपनिषद आहे.

तेव्हा त्यावर चिंतन करावे हा विचार केवळ श्री गणपती उपासनेमुळे मनात आला.

श्री सद्‌गुरु परम पूजनीय चिन्मयानंदजी महाराजांचे स्मरण करून, श्री गजाननाची कृपेसाठी प्रार्थना करून ह्या चिंतनाचा संकल्प करतो.

।। श्री गणेशाय नमः ।।

# ।। अथ गणपती-अथर्वशीर्ष प्रारंभः ।।

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः । भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः। स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः । व्यशेम देवहितं यदायुः ।।१।। ॐ स्वस्ति न इंद्रो वृद्धश्रवाः । स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।। स्वस्तिनस्ताक्ष्यों अरिष्टनेमिः स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।।२।। ॐ शान्तिः! शान्तिः!! शान्तिः!!!

।। अथ गणेशार्थवशीर्ष व्याख्यास्यामः ।।

ॐ नमस्ते गणपतये ।। त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि ।। त्वमेव केवलं कर्ताऽसि ।। त्वमेव केवलं धर्ताऽसि ।। त्वमेव केवलम् हर्ताऽसि ।। त्वमेव सर्व-खल्विदं ब्रह्मासि । त्वं साक्षादात्माऽसि नित्यं ।।१।। ऋतं वच्मि ।। सत्यं वच्मि ।।२।। अव त्वं मां ।। अव वक्तारं ।। अव श्रोतारं ।। अव दातारं ।। अव धातारं ।। अवानूचानमवशिष्यं ।। अव पश्चात्तात् ।। अवपुरस्तात् ।। अवोत्तरात्तात् अव दक्षिणात्तात् ।। अवचोर्ध्वात्तात् ।। अवाधरात्तात् ।। सर्वतो मां पाहि पाहि समन्तात् ।।३।। त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः ।। त्वमानंदमयस्त्वं ब्रह्ममयः।। त्वं सच्चिदानंदाद्वितीयोऽसि ।।।। त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि ।। त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि सर्व जगदिदं त्वत्तो जायते ।। सर्व जगदिदं त्वत्तस्तिष्ठति ।। सर्व जगदिदं त्वयि लयमेष्यति ।। सर्व जगदिद त्वयि प्रत्येति ।। त्वं भूमिरापोऽनलोऽनिलोनभः।। त्वं चत्वारि वाक्पदानि ।।५।। त्वंगुणत्रयातीतः ।। त्वमवस्थात्रयातीतः ।। त्वं देहत्रयातीतः ।। त्वं कालत्रयातीतः ।। त्वं मूलाधार स्थितोऽसि नित्यं ।। त्वं शक्तित्रयात्मकः।। त्वांयोगिनो ध्यायंतिनित्यं । त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वं इंद्रस्त्वं अग्निस्त्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भूवस्वरोम् ।।६।। गणादिं पूर्वमुच्चार्यं वर्णादिं तदनन्तरं ।। अनुस्वारः परतरः ।। अर्धेन्दुलसितं।। तारेणऋद्धम् ।। एतत्तवमनुस्वरूपं ।। गकारः पूर्वरूपं ।। अकारो मध्यम रूपं ।। अनुस्वारश्चान्त्यरूपं ।। बिन्दुरुत्तररूपं ।। नादः संधानं । संहिता सन्धिः ।। सैषा गणेशविद्या ।। गणकऋषिः ।। निचृद्गायत्रीछन्दः ।। गणपतिर्देवता ।। ॐ गं गणपतये नमः ।।७।। एकदन्ताय विद्महे ।। वक्रतुंडाय धीमहि ।। तन्नो दन्ती प्रचोदयात ।।८।। एकदन्त चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम् ।। रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं

मूषकध्वजम् ।। रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम्।। रक्तगंधानुलिप्तांग रक्तपुष्पैः सुपूजितम् ।। भक्तानुकम्पिनं देवं जगत्कारणमच्युतम् ।। आविर्भूतं च सृष्ट्यादौ प्रकृतेः पुरुषात्परम् ।। एवं ध्यायति यो नित्यं स योगिनां वरः ।।९।। नमो व्रातपतये ।। नमो गणपतये नमः ।। प्रमथपतये नमस्तेऽस्तु लंबोदरायैकदंताय ।। विघ्ननाशिने शिवसुताय ।। श्रीवरदमूर्तये नमो नमः ।।१०।। एतदथर्वशीर्षं योऽधीते ।। स ब्रह्मभूयाय कल्पते ।। स सर्वतः सुखमेधते ।। स सर्व विघ्नैर्न बाध्यते ।। स पञ्चमहापापात्प्रमुच्यते ।। सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति ।। प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति ।। सायं प्रातः प्रयुंजानो अपापो भवति ।। सर्वत्राधीयानोऽपविघ्नो भवति ।। धर्मार्थकाममोक्षं च विंदति ।। इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम् ।। यो यदि मोहाद्दास्यति ।। स पापीयान भवति ।। सहस्रावर्तनात् यं यं काममधीते तं तमनेन साधयेत् ।।११।। अनेन गणपतिमभिषिंचति स वाग्मी भवति ।। चतुर्थ्यामनश्नन् जपति ।। स विद्यावान् भवति ।। इत्यथर्णवाक्यं ।। ब्रह्माद्यावरणं विद्यात् न बिभेति कदाचनेति ।।१२।। योदूर्वांकुरैर्यजति ।। स वैश्रवणोपमो भवति ।। योलाजैर्यजति स यशोवान् भवति ।। स मेधा वान् भवति ।। यो मोदक सहस्रेण यजति स वांछितफलमवाप्नोति ।। यः साज्यसमिद्भिर्यजति स सर्वं लभते स सर्वं लभते ।।१३।। अष्टौ ब्राह्मणान् सम्यग्ग्राहयित्वा सूर्यवर्चस्वी भवति ।। सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासनिधौ वा जप्त्वा सिद्धमंत्रो भवति ।। महाविघ्नात्प्रमुच्यते ।। महादोषात्प्रमुच्यते ।। महापापात् प्रमुच्यते ।। स सर्वविदंभवति ।। स सर्वविद्भवति।। य एवं देव इत्युपनिषत् ।।१४।। ॐ सहनाववतु ।। सहनौभुनक्तु।। सहवीर्यं करवावहै ।। तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ।। ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम् देवा ।। भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।। स्थिरैरगैस्तुष्टवांसस्तनूभिः व्यशेम देवहितं यदायुः ।।१।। ॐ स्वस्ति न इंद्रो वृद्धश्रवाः स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।। स्वस्तिनस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः ।। स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।।२।। ॐ शांतिः शांतिः शांतिः! इति श्रीगणपत्यथर्वशीर्षं समाप्तम् ।।

।। श्री गणेशाय नमः ।।

।। श्री गणपत्यथर्वशीर्षम् ।।

# शांतिपाठ

।। ॐ ।।

**ॐ भद्रं कर्णेभिः श्रुणुयाम देवाः भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।**
**स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ।।१।।**
**ॐ स्वस्ति न इंद्रोवृद्धश्रवाः स्वस्ति न पूषा विश्ववेदाः**
**स्वस्ति नस्ताक्ष्यों अरिष्टनेमिः स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।।२।।**
**ॐ शांति शांति शांतिः ।।**

**भावार्थ :** हे देवांनो आमच्या कानांना शुभ वार्ताच ऐकू यावी. आमच्या डोळ्यांना शुभाचेच दर्शन होवो.

जे काही प्राप्त आयुष्य लाभले आहे ते सुदृढ अवयवानी व शरीराने युक्त असो व ते ईशस्तुति करत व्यतीत होवो.

ज्ञानवृद्ध ऋषीकडून ज्याची कीर्ति ऐकिवात आहे असा इंद्र आमचे कल्याण करो.

सर्वांचे भरण पोषण करणारा व सर्वज्ञ असा सूर्य आमचे मंगल करो.

प्रचंड झेपेत सर्व संकटाचा नाश करणारा गरुड आमचे शुभ करो.

देव गुरू बृहस्पतिचा आमच्यावर वरद हस्त असो. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक असे तीन प्रकारचे ताप नष्ट होवोत.

ၜၛ

।। श्री गणपत्यथर्वशीर्षम् ।।

- प्रारंभ -

## ।। ॐ नमस्ते गणपतये ।।

**भावार्थ :** ॐ! गणपतीला माझा नमस्कार असो.

**विवेचन :** वैदिक धर्मानुसार प्रारंभी ॐ उच्चारणाची पद्धत आहे. तसेच कोणीही भेटल्यावर प्रथम त्याला नमस्कार करून त्याच्याशी सुसंवाद साधावा असे सुसंस्कृत माणसाचे वर्तन असते.

व्यवहारात वयाने मोठ्या असणाऱ्या माणसाला दादा, नमस्कार किंवा काका नमस्ते म्हणतात तर लहानास 'बेटा कसा आहेस' असे संबोधितात.

गजानन हे परब्रह्म स्वरूप आहे. त्याला ॐ असे संबोधन वापरणे हेच योग्य आहे.

'नमस्ते', तुला नमस्कार असो, ह्या मध्ये विनीत होणे, नम्र होणे, त्याचे श्रेष्ठत्व व पर्यायाने आपले कनिष्ठ स्थान मान्य करून त्याच्या मतांचा आदर करणे हा भाव प्रगट होतो. व मी तुला मानतो व माझा सर्व भार तुझ्यावर सोपवतो अशी शरणागती अभिप्रेत आहे. गणपती ह्याचा रूढार्थ गणांचा पति, ह्या अर्थापेक्षा वेगळा अर्थ आपण बघू या.

'गण्' ह्या धातुचा अर्थ आहे गणना करणे, मोजणे. गण्य म्हणजे मोजता येण्याजोगे. व गण्यपति म्हणजे जे काही मोजदाद करता येते त्याचा पति. तो स्वत: अगण्य म्हणजे मोजदाद करण्याच्या पलिकडचा आहे.

केवळ परम तत्त्व/ परम ब्रह्म अ-गण्य आहे. बाकी सर्व चर/अचर; गोचर/अ गोचर विश्व हे मोजदाद करण्याजोगे म्हणजे सीमित आहे. पण परम तत्त्व असीम आहे. अथर्वशीर्षातील पहिल्या मंत्रामध्येच श्री गणपति रूप सगुण जरी भावले तरी साधकाने त्याचे असीम, अमित असे सर्व विश्वव्यापकत्व ध्यानात ठेवावे व मग इंद्रियगोचर होऊ शकणाऱ्या अशा सगुण रूपाचे पूजन करावे. सगुण रूपाची आराधना करताना हा भाव असावा की हे गजानना तू वास्तविक इंद्रियांना गोचर नाहीस कारण तू इंद्रियाची मूळ शक्ति आहेस मी तुझे मूळ स्वरूपांत जे खरोखर अ-रूप आहे त्यावर ध्यान करू शकत नाही म्हणून केवळ तुझ्या अ-रूपाचे भान ठेवून सगुणाचे ध्यान करीत आहे.

ॐ

## ।। त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि ।।

**भावार्थ :** तूच केवळ ते (परम) तत्त्व आहेस.

**विवेचन :** अथर्वशीर्ष हे केवळ स्तोत्र नसून उपनिषद आहे. उपनिषदाचा विषय जीव ब्रह्म ऐक्य हाच आहे.

'तत् त्वम् असि' ही तत्त्वमसि ह्या पदाची फोड. तत् - ते; त्वम - तू; असि - आहेस तत् ह्या पदात सर्व सृष्टीचा अंतर्भाव होतो. गोचर/अगोचर, नामरूपात्मक जगत, सापेक्ष विश्व, जे वस्तुमान, अवकाश व काळ ह्यांच्या मर्यादेत आहे ते सर्व पदार्थमय जगत् हे सर्व 'ते' ह्या सर्वनामाने निर्देशित होते. हे सर्व 'गजानन' स्वरूप आहे व गजानन म्हणजेच ब्रह्म तत्त्व होय. खरं तर सर्व विश्व ब्रह्ममय आहे ह्याचाच अर्थ हा 'जीव' देखील ब्रह्मच आहे.

तेव्हा साधकाने ही धारणा करायची आहे. की हे सर्व वर्णन आपले 'स्व' चे आहे. हे माझे स्वरूप आहे. देह मन बुद्धी ह्या केवळ माझ्या उपाधी असून मी ब्रह्मस्वरूप आहे हे परक्याचे वर्णन नसून आपले आहे अशी भावना केली तर प्रेम किंवा भक्ति जडू शकते. प्रेम केवळ 'आपलेपणा'वर जडते. परकेपणा बद्दल एक तर उदासीनता असते किंवा परका प्रतिकूल झाला तर द्वेष वाटतो व अनुकूल असला तर केवळ अनुकूल असेपर्यंत हवासा वाटतो. पण 'स्व' वर स्वतःवर आपले 'सहज' प्रेम असते.

म्हणून गजाननाचे 'स्व-रूप' जे 'ब्रह्ममय' आहे तेच माझे स्व-रूप आहे असे पटले तर ह्या स्वरूपावर, 'सहज' अ-कारण, निरपेक्ष, 'निखळ' प्रेम जडते. ह्याच स्वरुपाचे वर्णन ऋषी पुढे चालू ठेवतात....

**त्वमेव केवलम् कर्ताऽसि**
**त्वमेव केवलम् धर्ताऽसि**
**त्वमेव केवलम् हर्ताऽसि**
**त्वमेव सर्वम् खल्विदं ब्रह्माऽसि**
**त्वं साक्षात् आत्मासि नित्यम्**

**भावार्थ :** तूच केवळ कर्ता, धारण करणारा, हरण करणारा आहेस. तूच केवळ हे बृहद्तत्त्व (विश्व) आहेच. तूच साक्षात अविनाशी आत्मतत्त्व होय.

**विवेचन :** ह्या सर्व विश्वाचा कर्ता गजानन आहे. पालन पोषण तूच करतोच व संहार देखील तूच करतोस. साधकाच्या दृष्टीकोनातून परमेश्वरच सर्व करतो करवितो हा भाव सतत ठेवल्यास अहंकार आपसूक सुटतो.

आता कर्ता धर्ता तूच आहे ऐकल्यावर असे वाटते की हा 'भगवान गजानन' नावाचा कोणीतरी थोर कोठेतरी रहात असावा व तेथून तो आपल्या मर्जीप्रमाणे सर्व सूत्र हलवत असावा. असं नाही. याचा खुलासा करण्यासाठी ऋषी म्हणतात.

## त्वम् एव खलु इदम् ब्रह्मासि

**भावार्थ :** 'हे' जे जगत आहे । विश्व आहे 'ते' सर्व काही खरोखर तूच आहेस व ब्रह्मतत्त्व हेच ते आहे. व तेच तू आहेस.

**विवेचन :** जगत उत्पत्तिच्या संदर्भात अनेक मते व सिद्धांत आहेत.

पण वेदांताचा सिद्धान्त आपण बघू.

वास्तविक कोणत्याही निर्मितीस उपादान कारण (Material Cause) व निमित्त कारण (Efficient Cause) असे दोन घटक लागतात. घडा बनवायचा असेल तर माती (Material Cause) उपादान व कुंभार (Efficient Cause) निमित्त म्हणून हवा. पण सृष्टी ही घट, पट, खुर्चीसारखी तयार होत नसून परमतत्त्वावर एक देखावा/भास म्हणून दिसते. जसं दोरीवर साप, किंवा खांबावर भूत भासते. भूत हे खांबाच्या आधारावर आहे ते म्हटलं तर खांबाच्या पासून किंवा खांबाचा एक भाग आहे. व खांबाचे ज्ञान झाल्यावर खांबात ते विलीन होते. खांबावर भूत दिसणे हा एक भास होता.

तद्वत् जगत् हा परमतत्त्वावरील एक भास आहे.

शेवटी ऋषी परम सिद्धांत सांगतात हा जो आत्मा किंवा जीव आहे तो तूच आहेस. लक्षात घ्यावं की मी जीव जो लघु सीमित निर्बल आहे असं वाटतो तो वस्तुत: परम तत्त्व आहे. जीव व गजानन हे एकच आहे ते तेव्हा हे सर्व माझ्या आत्मस्वरुपाचे वर्णन आहे. जीव व ब्रह्म ऐक्य येथे प्रस्थापित केले.

आतापर्यंत ऋषीनी गजाननाचे अंतरंग स्वरुप सांगितले. एकदा का स्वरूपाचा अंदाज आला की मग त्याची प्राप्ती अथवा अनुभूति कशी घ्यावी यासाठी पुढे सहा पायऱ्याची (षड् अंग साधना) साधना सांगतात.

ॐ

## ।। ऋतं वच्मि ।। सत्यं वच्मि ।।

**भावार्थ :** मी यथार्थ व त्रिकालाबाधित सत्य तेच बोलत आहे.

**विवेचन :** गजाननाचे अंतरंग स्पष्ट केल्यावर ऋषींना जाणवले की आपण जे बोललो ते अत्यंत गूढ व अति उच्च वैज्ञानिक तत्व सांगितले. कदाचित ऐकणाऱ्याला अथवा वाचणाऱ्याला शंका येईल हे खरे कशावरून किंवा ह्यांना काय माहित?

म्हणून ऋषी पुढे विवरण करण्याआधी सांगतात, "मी आपल्याला ऋत तेच सांगतोय व सत्य तेच सांगतोय."

संस्कृत भाषा ही अतिशय संपन्न आहे.

वास्तविक ऋत व सत्य ह्याचा व्यवहारात अर्थ एकच करतात म्हणजे 'खरे' सांगतो.

पण ऋषींनी येथे ऋत व सत्य हे दोन वेगळे शब्द योजले आहेत.

**ऋत् -** १ गण परस्मैपद - जाणे, स्पर्धा करणे, दया करणे (गीर्वाण लघु कोश ज. वि. ओक) तेव्हा ऋत म्हणजे जाणारे किंवा बदलणारे गतिमान अशा गोष्टी किंवा तत्त्व.

पण सत् किंवा सत्य म्हणजे जे नेहमी खरे किंवा न बदलणारे त्रिकालाबाधित. ऋषी म्हणतात मी जे काही ब्रह्मज्ञान सांगितले ते त्रिकालाबाधित आहे. व जी काही साधने सांगेन ऋत म्हणजे परिस्थितीनुसार बदलत जाणारी आहेत पण खरी आहेत. पण त्यामध्ये बदल घडू शकतो. अध्यात्मविद्येवर प्रवचन करताना परिस्थितीनुरूप शब्द किंवा वाक्ये बोलण्याची वेळ ऋषीवर येणार होती. प्रत्येक वेळी पुढे त्याचा खुलासा करणे बोलण्याच्या ओघात जमले नसते म्हणून येथे ऋषी प्रथमच खुलासा करत आहेत की जे मी सांगेन ते सर्व खरेच असेल पण काही भाग त्रिकालाबाधित असे सत्य असेल तर काही भाग ऋत म्हणजे कालमानानुसार बदलणारा असेल पण खरा असेल.

# ।। अव त्वं माम् ।।

**भावार्थ :** तू माझे रक्षण कर.

**विवेचन :** ऋषी गजाननाची प्रार्थना करतात गजानना तू माझे रक्षण कर. हा मंत्र व पुढील १३ मंत्र माझे रक्षण कर अशा अर्थाप्रत प्रार्थना आहेत. बाह्य स्वरुप किंवा व्यावहारीक स्वरूप प्रार्थनेचे असले तरी अथर्वण ऋषीनी हे चौदा मंत्र उगाच भौतिक/व्यावहारिक संरक्षण स्वरूप मागणीसाठी परब्रह्मरूप गजाननापुढे मांडले नसावेत.

तू ह्या 'मी'चे रक्षण कर. अव ह्या धातूला इतर अर्थ आहेत.

अव्-१ प.प.- रक्षण करणे, सुख देणे, जाणणे, समजणे, आवडणे, इच्छिणे (गीर्वाण लघु कोश - आपटे)

ऋषी म्हणतात, मी अज्ञानी लघु जीव आहे असे वाटते. पण मी तुझाच अंश आहे मीच परब्रह्म आहे याची जाणीव मला आणून दे.

साधनेतला हा पहिला टप्पा आहे मुमुक्षत्व मला माझे स्वरुप जाणायचे आहे ही इच्छा होणे म्हणजेच जीवनात मंगल पहाट होणे होय. शास्त्र म्हणजे जीवाकडून कळत न कळत जेव्हा सुकृत होते म्हणजे त्याच्याकडून इतर जीवांची व परमेश्वराच्या सृष्टीची सेवा घडते तेव्हाच तो परमेश्वर जीवाच्या मनांत ही कल्याणकारी इच्छा उत्पन्न करतो.

लक्षात घ्यावे की प्रथम जीवाकडून सुकृत व्हावे लागते व मग ईश्वरकृपा होते.

ईश्वर मगच त्या जीवाच्या मनात मुमुक्षत्व उत्पन्न करतो. एवढ्यावर ईश्वराची कृपा थांबत नाही तर ईश्वर त्याच्या करता गुरुकरवी मार्गदर्शनाची योजना स्वत: करतो. सद्गुरु जीवाला त्याच्या कलाकलाने विकसित करतात.

प्रार्थना याचा खरा अर्थ आहे अर्थम् प्रति नीयते इति प्रार्थना. अर्थ म्हणजे पुरुषार्थ चार अर्थ आहेत.

धर्म - ज्ञान
अर्थ - संपत्ति वैभव
काम - सर्व प्रकारचे भोग
मोक्ष - अंतिम ज्ञान मुक्ति
ह्या मंत्रात धर्म व मोक्ष - अर्थासाठी परमतत्त्वाची प्रार्थना केली आहे.
हे ईश्वरा माझ्या मनात मुमुक्षत्व उत्पन्न कर.

## ।। अव वक्तारम् ।।

**भावार्थ :** तुझ्या स्वरुपाचे वर्णन करणाऱ्याचे तू रक्षण कर. हा झाला व्यावहारिक बाह्यांग अर्थ.

**विवेचन :** ऋषींना आता गुरु प्राप्त झालाय व तो सद्‌गुरु साधकांना ज्ञान प्रदान करत आहे. म्हणून साधक देखील गजाननाकडे गुरुला आयुरारोग्य मिळो म्हणून प्रार्थना करतात.

येथे अभिप्रेत अर्थ आहे की गुरुची सेवा घडणे आवश्यक आहे. सेवा ही सर्वसाधारण शारीरिक व्यावहारिक सेवा तर गरजेनुसार करावी. पण गुरूने शिकवलेल्या ज्ञानाचा स्वानुभव घेणे हा सेवेचा खरा अर्थ गुरुला अभिप्रेत आहे. शारीरिक सेवा त्याचा सन्मान जगात वाढवणे ह्यापेक्षा ही शिष्याने ज्ञान प्राप्ती करून अनुभूति घ्यावी अशी प्रत्येक सद्‌गुरुची अपेक्षा असते. व ही अपेक्षा पूर्ण करण्यासाठी साधक गजाननाकडे प्रार्थना करतात, ''परमेश्वरा तू माझ्या गुरूच्या पाठीशी रहा त्याना सर्वोतोपरी मदत करून त्यांच्याकडून मला आपले ज्ञान प्राप्त होईल असे करा.''

## ।। अव श्रोतारम् ।।

**भावार्थ :** हे गजानना ऐकणाऱ्याचे रक्षण कर.

**विवेचन :** गुरुकडून प्रथम श्रवण म्हणजे नीट जीवाचा कान करून ऐकणे हे महत्वाचे. विकासाच्या सोपानात नीट ऐकून ते नीटनेटके मेंदूत साठवणे म्हणजे श्रवण व ह्यासाठी पण ईश्वराच्या सहाय्याची साधकाला गरज आहे. म्हणून ही प्रार्थना.

## ।। अव धातारम् ।।

गजानना ज्ञान धारण करणाऱ्याचे रक्षण कर.

## ।। अवानुचानम् अव शिष्यम् ।।

**भावार्थ :** सतत एका जागी ज्ञान गोळा (संग्रह) करणाऱ्यांचे व शिष्याचे रक्षण कर.

**विवेचन :** आता आपण वक्ता, श्रोता, दाता, धाता अनुचानम् (संग्राहक) व शिष्य ह्यांचा एकत्रित विचार करू.

लक्षात घ्यावे जरी गुरु ज्ञान दाता व शिष्य ज्ञान ग्राहक हीच एक महत्वाची जोडी

असली तरी ज्ञान देणे व ज्ञान घेणे ह्या प्रक्रियेसाठी फक्त गुरू व शिष्य केवळ हे दोघेच असून चालत नाहीत. ह्यासाठी एक मोठी संघटना लागते त्यामध्ये आधुनिक भाषेत बोलायचे तर विद्यापीठ व वैदिक काळी गुरुकूल असावे लागते व विद्यापीठ व गुरुकूल हे अनेकांच्या सहकार्याने होते.

आपण तौलनिक अभ्यास करू.

| | **वैदिक पुराणकाळ** | **आधुनिक काळ** |
|---|---|---|
| **वक्ता** | गुरुकुल प्रमुख ऋषी | प्राध्यापक |
| **श्रोता** | शिष्य | शिष्य |
| **दाता** | राजा, धनिक | सरकार, दानी |
| **धाता** | उपगुरु किंवा ज्ञान साठवायची साधने ग्रंथ | लेक्चरर, लायब्ररी ग्रंथ, सामुग्री |
| **संग्राहक** | लेखक/ऋषी | Documentors |
| **शिष्य** | साधक अथवा सहाय्यक | विद्यार्थी अथवा सहाय्यक |

ऋषिंना व्यापक अर्थाने म्हणावयाचे आहे की ज्ञान प्रक्रियेत आवश्यक असलेले सर्व घटक हे ईश्वराकडून प्रेरित किंवा अनुशासित असतात म्हणून ईश्वराची कृपा असेल तरच ज्ञान दानाचं व घेण्याचं कार्य घडू शकत. त्यासाठी फक्त गुरु नव्हेच तर गुरुकुलाच्या सर्व यंत्रणेवर ईश्वराचा अनुग्रह हवा.

**अव पश्चातात्**
**अव पुरस्तात्**
**अवोत्तरात्तात्**
**अवदक्षिणात्तात्**
**अव चोर्ध्वात्तात्**
**अवाधरात्तात्**
**सर्वतो माम् पाहि पाहि समन्तात्**

**भावार्थ :** माझे पाठीमागून (पश्चिम) पुढून (पूर्व) उत्तरेकडून दक्षिणेकडून, आकाश दिशेकडून पाताळ दिशेकडून रक्षण कर.

तू माझे सर्व बाजूने सर्व ठिकाणी रक्षण कर.

**विवेचन :** संकटे दोन प्रकारची असतात. एक स्वगत म्हणजे आपणच मनांत

उत्पन्न केलेली व दुसरी बाह्य. स्वगत संकटे ही स्वत:च्या शरीराचे स्वास्थ्य, मन बुद्धीचे स्वास्थ्य इत्यादी ह्यासाठी प्रथम प्रार्थना केली.

बाह्य संकटे ही निसर्गाचा कोप, बाह्य प्राणिमात्र व सजीवाकडून त्रास इत्यादी असतात. त्यासाठी ऋषी गजाननाला प्रार्थना करतात की हे ईश्वरा तू माझे सर्व दिशाकडून व सर्व ठिकाणी रक्षण कर.

## त्वम् वाङ्मय ।।

**भावार्थ :** तू वाचा स्वरूप आहेस.

**विवेचन :** मय हा प्रत्यय लागला की ओतप्रोत असा अर्थ होतो. गजानन वाचेमध्ये ओतप्रोत आहे. किंवा वाचा हे गजाननाचे स्वरूप आहे.

वाच् हा मूळ शब्द आहे.

वाच - भाषा, शब्द, सरस्वती,

शब्द म्हणजे मूळ नाद व उपयुक्त नादाच्या समूहाने शब्द होतो व अर्थवाही होतो. शब्दाच्या मूळात असलेला नाद हे गजाननाचे रूप आहे. याचा अजून विस्तारित अर्थ 'त्वम् चत्वारी वाक्पदानि' ह्या मंत्रात बघु.

## त्वम् चिन्मयः ।।
## त्वम् आनंदमयः ।।
## त्वम् ब्रह्ममयः ।।
## त्वम् सत् चित् आनंदमय अद्वितीयोऽसि ।।

**भावार्थ :** गजानना तू चित् मय आहेस. ब्रह्मतत्त्व अ-बोध किंवा जड नाही ते जाणीवतत्त्व आहे. ते चेतनायुक्त आहे.

गणेश तत्त्व हे आनंदमय आहे.

**विवेचन :** गजाननाचे स्व-रूप हे चेतनामय आहे पण ते आनंदमय देखील आहे. हे दोन्ही शब्द व्यवहारात वापरतात तसे नाहीत.

सचेतन /अचेतन किंवा सजीव/निर्जीव असे व्यवहारात आपण जाणतो. दगड निर्जीव व त्याला समजत नाही! पण सजीव जाणीवयुक्त असतो. परमतत्वाचे चित् मयत्व हे ह्या पलिकडचे आहे. तसेच सुख दु:ख हे भाव इंद्रियांच्या अनुकूल प्रतिकूलतेवर अवलंबून असतात पण गजाननाचे आनंद स्वरूप हे ह्या द्वंद्वाच्या पलिकडचे आहे. त्याला कारण लागत नाही. ते सहज स्वरुप/आनंदमय आहे. जर मन विचारविरहीत व प्रशांत असेल तर सहज आनंद काय याचा थोडा अंदाज येईल. खरं तर आनंद ही अवस्था नसून ते माझं खरं स्वरूप आहे पण जेव्हा ह्या शांत अंत:करणात विचाराची किंवा इच्छेची लाट उमटते तेव्हा जीवाला आनंदस्वरूपाचे विस्मरण होते व इच्छापूर्ती अपेक्षाभंग ह्या स्वरूपात सुख दु:ख सुरू होते. मन शांत निर्विकार किंवा इच्छा रहित करण्याचा समाधीच्या अभ्यासाने याची अनुभूति येते. समाधी - सम धी. बुद्धि /अंत:करण सम अवस्थेत राखणे म्हणजे समाधी. ही साधना आहे.

ऋषी म्हणतात हेच ते परब्रह्म तत्त्व जे स्वरुपत: चित् आनंद स्वरुप आहे. ते सत् म्हणजे प्रथम आहे. जे चिन्मय व आनंदमय आहे ते अद्वितीय म्हणजे तेच आणि केवळ तेच आहे.

ॐ

## || त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि ||

**भावार्थ :** तू (खरोखर) स्वत: (केवळ) ब्रह्मच आहेस.

**विवेचन :** श्री गजाननाचे खरे स्वरूप सत् म्हणजे केवळ अस्तित्व स्वरूप, चित म्हणजे भाति-चैतन्य स्वरूप आणि आनंद म्हणजे प्रीति-सुख स्वरूप असे आहे असे सांगितल्या नंतर ऋषिना वाटत की असणे, भासणे व प्रिय वाटणे ही विशेषणे वस्तु जगाचे निर्देशन करतात. व त्यामुळे गजानन हा कोणी व्यक्ति आहे अशी समजूत होइल. म्हणून ते लगेच स्पष्ट करतात की गजानन केवळ ब्रह्म स्वरूप आहेत. जगत वस्तु नाहीत.

## || त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि ||

**भावार्थ :** तू ज्ञानमय आणि विज्ञानमय आहेस.

**विवेचन :** येथे ऋषि गजाननला ज्ञान विज्ञान मय म्हणतात. प्रथम आपण "मय" याचा अर्थ समजाऊन घेउया.

मय म्हणजे युक्त. उदा: रसमय रसाने भरलेला.

मय चा दुसरा अर्थ म्हणजे स्वरूप. तेजोमय सूर्य. तेज हेच त्याचे स्वरूप आहे. नव्हे तेज म्हणजेच सूर्य.

ज्ञान याचा अर्थ समजण्यासाठी प्रथम विज्ञान म्हणजे काय हे जाणूया.

विज्ञान: विशेष ज्ञान. विविध ज्ञान. विविध वस्तु-व्यक्ति, चर-अचर, नामरूपात्मक जगाचे माहिती वजा ज्ञान. हे ज्ञान केवळ पंचमहाभूतात्मक इंद्रिये व अंतकरणाद्वारे पंचमहाभूतात्मक वस्तु जगताचे होते. ह्या ज्ञानाला अवकाशात्मक स्थळ, काळ व वस्तुमान ह्या चौकट आहे.

ज्ञान: याचा अर्थ परमतत्त्वाचे ज्ञान. पण हे परमतत्त्व वस्तु नाही. त्यामुळे त्याला गुणधर्म नाहीत. म्हणुन पंचमहाभूतात्मक इंद्रिये व अंतकरणाद्वारे त्याचे आकलन होत नाही. म्हणुन हे ज्ञान केवळ बोध स्वरूप असते. किंबहुना ती केवळ ब्रह्म अवस्था आहे. ते केवळ असणे आहे.

आता ज्ञानमय-विज्ञानमय याचा एकत्रीत अर्थ पाहूया.

गजानन जगत वस्तु किंवा अस्तित्वाने भरलेला असा आहे का ? गजानन ही वस्तु नाही त्यामुळे त्याच्यात अवकाश म्हणजे जागा नाहीच आहे. खर तर त्याला अवकाशच लागत नाही. तो अवकाशाच्य अतीत आहे. व म्हणुन गजाननात जग किंवा अस्तित्व भरलेले नाही.

तर गजानन म्हणजे अस्तित्व आहे. आणि गजानन म्हणजेच जग आहे. जग हे गजाननाहून भिन्न नाही. जग हे केवळ गजाननावर भासित आहे. विवर्त आहे. अशा रीतिने ज्ञान व विज्ञान म्हणजे केवळ गजानन आहे.

येथे खरतर ब्रह्म स्तिती म्हणजे काय याचा बोध करून द्यायचा प्रयत्न केला आहे. तसेच सर्वत्र केवळ गजानन म्हणजे केवळ ब्रह्म आहे व जग हा केवळ भास आहे अशा अजातवादाचे प्रतिपादन केले आहे हे जाणावे.

## ।। सर्व जगत् इदम् त्वत्तो जायते ।।

**भावार्थ :** सर्व जगत तुझ्यापासून उत्पन्न होते.

**विवेचन :** तत् त्वम् असि हे उपनिषदातील महावाक्य आहे. 'तेच तू आहेस' हे समजण्यासाठी व समजून देण्यासाठी सर्व वेद व त्यांच्या आधारे सर्व संत महात्मे व सद्गुरु प्रयत्न करत असतात.

तत् पद म्हणजे ते परमतत्व

तू पद म्हणजे लघु जीवात्मा / जगत असि ह्या पदाने दोघांचे एकत्व सांगतात. प्रथम परब्रह्माचे स्वरुप काय आहे हे आतापर्यंत वर्णन केले आहे. आता तू पद म्हणजे त्वम् जे इदम् जगतम् चा भाग आहे त्या विश्वची उत्पत्ति कशी होते किंवा विश्वाचा व परमतत्त्वाचा संबंध काय हे समजण्यासाठी ऋषी सांगतात हे सर्व जगत तुझ्या मध्येच जन्मते / तयार होते.

पुढील तीन मंत्र आपण एकत्रितपणे अभ्यासात घेऊ.

## 'सर्व जगत् इदम् त्वत्तस्तिष्ठति'

**भावार्थ :** सर्व जगत तुझ्यामध्ये स्थिर आहे.

## 'सर्वं जगत् इदम् त्वयि लयमेष्यति'

सर्व जगत तुझ्यामध्ये विलीन होते.

## 'सर्व जगत् इदम् त्वयि प्रत्येति'

**भावार्थ :** सर्व जगत् तुझ्यावर भासमान आहे.

**विवेचन :** जगत् ह्या शब्दातच त्याचा अर्थ आहे. ज - जायते जन्मते गत - जात असलेले, लयास जात असलेले.

परम तत्त्वापासून प्रथम शिव तत्त्व होते. कोणी त्याला महद् असेही म्हणतात. शिव तत्त्व अप्रकट (unmanifested) असते. त्यापासून ओम् तत्त्व (गजानन तत्त्व) होते. (ओंकारेश्वर ओंकाराचा ईश्वर शंकर) ओंकार हे ब्रह्मन्चे पहिले सगुण/प्रगट रूप. व त्यानंतर विविधतेच्या जगाची रचना होते.

येथे ओंकार (गजाननाला) जगाची उत्पत्ति म्हटली आहे ते योग्यच आहे.

केवळ ओंकारामध्ये, ओंकारापासून, ओंकारामुळे ह्या जगताची उत्पत्ति व स्थिति होते. त्यामध्येच त्याचा लय होतो. **ऋषी एकदम म्हणून जातात.** "गजानना तुझ्यावर हे जग प्रत्ययास येते. हे जग परमतत्त्वावर भासमान आहे." याचा आपण पुढे विचार करू.

## ।। त्वम् भूमिः आपः अनलः अनिलः नमः।।

## त्वम् चत्त्वारि वाक्पदानि

**भावार्थ :** तू भूमि, जल, अग्नि, वायु, अवकाश आहेत. तू वाचेची चार रूपे आहेस.

**विवेचन :** सर्व जगत परमतत्वावर भासमय आहे हा वेदान्ताचा मूळ सिद्धान्त आहे. पण आपण ज्या सृष्टीमध्ये आहोत त्याच्या उत्पत्तिचा क्रम ऋषि सांगतात.

प्रथम ते एकटेच होते. 'अद्वितीय' असे होते. ते सत् चित् व आनंदमय होते.

त्याच्या मनात आले की जगत उत्पन्न करावे म्हणून त्याने आपल्या अनिर्वचनीय मायेच्या सहाय्याने प्रथम तत्त्व निर्माण केले त्याला शिव तत्त्व किंवा महद् म्हणतात ते अगोचर होते. त्यापासून ओंकार किंवा गणेश तत्त्व झाले.

ओंकारापासून अनुक्रमे अवकाश, वायु, अग्नि, जल व भूमि तत्त्वे झाली. व ह्या 'पाचां'च्या पंचीकरणाने (Permutation & Combination) हे गोचर/अगोचर; नामरूपात्मक असे सापेक्ष जगत झाले.

व उलट्या क्रमाने म्हणजे भूमि, जल, अग्नि, वायु, आकाश-ओंकार, शिव ह्या अनुक्रमाने हे विश्व गुंडाळले जाते.

ऋषि म्हणतात परा पश्यन्ति मध्यमा वैखरी ही वाणीची चार रुपे गजानन स्वरूप आहेत.

ह्याचा शास्त्रीय भाषेत विचार करू. सर्व जगत प्रथम नादमय होते. ध्वनीलहरीमय होते. पण ध्वनि म्हणजे केवळ ऐकायला येतो तो ध्वनी नव्हे. वेगवेगळ्या फ्रिक्वेन्सि प्रमाणे तो बदलतो.

**वैखरी -** मंत्राचा मोठ्याने उच्चार करून म्हणणे

**मध्यमा -** मंत्रदेवतेच्या चरणी मन बुद्धि अर्पण करून अस्फुट स्वरांत मंत्र म्हणणे

**पश्यन्ती -** मनांत जीभ न हलवता अनुसंधान ठेवून मंत्र जपणे.

**परा -** अंतर्यामीचा आपोआप होणारा जप ऐकणं

हा एक अभ्यास करण्याचा प्रकार आहे. तज्ञांनी त्यावर सखोल विचार करावा. ओंकार स्वरूप हे सगुण-गुणात्मक आहे. त्याचे मूलभूत गुण म्हणजे

त्याचे गुणधर्म म्हणजे सगुण ओंकाराचे भौतिक गुणधर्म -

१) **स-अवकाशता-** त्याला Space - अवकाश लागते. As it is matter it has space and form.

२) **शक्तिमय -** मूलभूत अग्निची शक्ती. उष्णता

३) **प्राकाश्य -** प्रकाश मय. केवळ मानवी डोळ्यांना दिसतो तो प्रकाश नव्हे.

४) **प्रवाहमय -** वहाण्याची /स्पंदनाची क्षमता Waves

लक्षात घ्या हे भौतिक शास्त्राच्या (Physics) भाषेत लिहिले आहे. हा एक ब्रह्मन समजून घेण्याचा प्रयत्न आहे. वेदांनाही जे कळले नाही ते भौतिक शास्त्राच्या माध्यमातून कळेल का? पण केवळ आस्था/श्रद्धा वाढावी म्हणून हा प्रयत्न.

# ।। त्वं गुणत्रयातीतः ।।

**भावार्थ :** तू तीनही गुणांच्या पलिकडचा आहेस.

**विवेचन :** गजाननाचे खरे स्व-रूप गुणांच्या अतीत आहे. परमतत्त्व हे गुणांच्या पलिकडे असते हा भाव सर्व सामान्यपणे मानवी मनाला आकळणे कठीणच. प्रथम गुण म्हणजे काय ते बघु.

गुण - गुणवान

पदार्थांचा गुणधर्म properties of anything/ matter

फायदा / उपयोग

कार्य परिणाम Effect or results

दोरी

पाश / बंधन

(गीर्वाण लघुकोश - आपटे)

सांख्य तत्त्वज्ञानाप्रमाणे जगाची उत्पत्ति अशी... प्रथम ते व तेच परमतत्त्व केवळ होते. त्याला गुणधर्म नव्हते. सृष्टीची उत्पत्ति त्याने का केली? याचे मानवी मनाला समाधानकारक उत्तर नाही. केवळ त्याला वाटले की 'एकोऽहम् बहुस्याम भवेन्' मी एकटे आहे तर बहुविध व्हावे; स्वतःला अनुभवावे, खेळ (लीला करावी) म्हणून त्याने आपल्यातून 'माया' (या मा सा माया - जी नाही ती माया) नावाची एक शक्ति निर्माण केली व त्यातून प्रथम अप्रकट असे महद तत्त्व किंवा शिव तत्त्व निर्माण झाले. त्याच्यापासून गजानन तत्त्व म्हणजे ओंकार निर्माण झाला व त्या ओंकारापासून (ओंकार हे पहिले साकार रुप) पंच महाभूते निर्माण झाली. सत्त्व, रज, तम असे तीन गुण पृथ्वी, आप तेज, पाणी, आकाश ह्या पाचही भूताना असतात.

**सत्त्व** - ज्ञान, चेतना, जाणीव

**रज** - हालचाल, शक्ति, प्रवाहीपणा

**तम** - अज्ञान, स्तब्धता, अंधकार, जडत्व

पाचही भुतांच्या सत्त्व गुण मात्रेच्या एकत्रितपणामुळे 'अंतःकरण' हे जाणीव घेणारे उपकरण अथवा पदार्थ तयार झाला. जेथे जेथे सजीवातील जाणीव/ मन दिसते ते पंचभूतां्च्या सत्त्व तन्मात्रेपासून झाले आहे.

तर रज मात्रेच्या एकत्रिकरणातून विश्वात दिसणारी सर्व शक्तिची रूपे तयार झाली.

प्राण शक्ति ही देखील रज तत्त्वाचा आविष्कार आहे.

तर तम मात्रेच्या एकत्रिकरणातून विश्वाचा जो जड भाग आहे, (सांगाडा Skeleton) तो तयार झाला.

थोडक्यांत जड देह हा अचेतन असतो त्यामध्ये प्राणशक्ति हालचाल घडवते व अंत:करण त्यामध्ये विश्वाची जाणीव ज्ञान घेते.

सर्व पदार्थांमध्ये रज गुण म्हणजे हालचाल व सत्त्व गुण म्हणजे जाणीव दिसत नाही.

अशाप्रकारे नीट विचार केला तर विश्व हे पाच महाभूते व त्यांच्या तीन गुणापासून तयार झाले आहे. त्याला Physics मध्ये Matter किंवा पदार्थ म्हणतात ज्याला गुणधर्म असतात. त्यालाच नाम रूपात्मक सापेक्ष जग म्हणतात. लक्षात घ्या परमतत्त्व ही गुणधर्मरहित निरपेक्ष अशी अवस्था आहे जेथे केवळ असणे आहे. शुद्ध जाणीव व शुद्ध आनंद आहे. जाणीव आनंद आहे हे पण म्हणजे केवळ मानवी बुद्धीच्या सोयीसाठी म्हणायचे पण खरे तर ते फक्त आहे.

ह्याचा अंदाज तेव्हाच येतो जेव्हा मन हे विषयवासनेतून मुक्त होते व त्यावर सद्गुरुची कृपा होते, अन्यथा मलिन मनाला हा विषय आकळणे शक्य नाही.

## ।। त्वम् अवस्था त्रयातीतः ।।

**भावार्थ :** तू मनाच्या तीनही अवस्थेच्या पलिकडचा आहेस.

**विवेचन :** अवस्था - अव + स्था
- जाणण्याची स्थिती

जागृतावस्था, स्वप्नावस्था व सुषुप्तिअवस्था ह्या मनाच्या तीन जाणण्याच्या स्थिती आहेत. ह्याच तीन अनुभव अवस्था होत. जागेपणी पंचज्ञानेंद्रियाद्वारे आपण बाह्य वस्तु जगताचे व अंत:करणाद्वारे आपण आपल्या व दुसऱ्यांच्या भाव व विचार विश्वाचे दर्शन घेतो. तर स्वप्नात मनातील संस्काराद्वारे स्वप्न जगताचे दर्शन करतो. सुषुप्तिमध्ये म्हणजे गाढ झोपेत केवळ आनंदाचा अनुभव उठल्यावर येतो. ह्या पलिकडे जी तुर्यावस्था आहे ती परमतत्त्वाची आहे. त्यामध्ये फक्त शुद्ध जाणीव असते पूर्ण बोधावस्था असते. ती आनंद स्वरुप अवस्था होय. चित् स्वरुप अवस्था होय.

## ।। त्वम् देहत्रयातीतः ।।

**भावार्थ :** तू देहातीत आहेस.

**विवेचन :** वास्तविक गुणातीत जो आहे तो देहातीत असणारच. प्रकृतीला गुण असतात व देह प्रकृतीचा म्हणजे पंचभूतात्मक असतो. गुणमय प्रकृती जेथे नाही तेथे देह संभवत नाही.

देह म्हणजे शरीर - शर्यते इति शरीरः जे झिजते ते शरीर. झीज/परिवर्तन हे प्रकृतीमध्ये होते. परमतत्त्वामध्ये झीज परिवर्तन होऊ शकत नाही.

शरीरे / देह तीन प्रकारचे असतात.

स्थूल शरीर - सूक्ष्म शरीर व कारण शरीर

स्थूल शरीर म्हणजे दिसणारा देह जो हाडामासाचा व रुधीराचा बनलेला असतो. तो जड असतो त्याला स्वतःची संवेदना नसते. पंच महाभूताच्या तम तन्मात्रेपासून तो बनला असतो.

ह्या स्थूल शरीरात सूक्ष्म शरीर म्हणजे प्राणमय कोश व अंतःकरण असते. हे सूक्ष्म शरीर अनुक्रमे रज व सत्त्व तन्मात्रेपासून बनते. प्राण शक्तिमुळे शरीरात अपचन, रक्तशुद्धि, हालचाल व इतर बळाची कामे इत्यादी कार्ये होतात. तर सत्त्व तन्मात्रेपासून होणारे अंतःकरण हे ह्या विश्वाची जाणीव घेते.

तिसरे कारण शरीर. हे वासनेचे बनलेले असते. पूर्वापार अनेक जन्माच्या वासना व ह्या जन्मातील वासना ह्याची सूक्ष्म प्रिंट म्हणजे कारण शरीर ह्याला कारण शरीर म्हणायचे कारण म्हणजे ह्या सूक्ष्म आराखड्याप्रमाणे आपल्याला वर्तमान काळी सर्व प्राप्त होते. शरीर वासनेमुळे जन्म मिळतो, म्हणून ते कारण शरीर. परमतत्त्वामध्ये स्थूल शरीर, सूक्ष्म व कारण शरीर नसते. म्हणून अथर्वणऋषी सांगतात परमतत्त्व/गजानन हा देहातीत आहे.

ൽൽ

## ।। त्वम् कालत्रयातीतः ।।

तू तीनही काळाच्या अतीत आहेस.

**भावार्थ :** ऋषी आता सांगतात तू वर्तमान भविष्य भूत ह्या तीनही काळाच्या अतीत आहेस.

**विवेचन :** वास्तविक गजाननाचे खरे स्व-रुप वेदांनाही वर्णन करता येत नाही. कारण ते निरपेक्ष (Absolute) असे तत्त्व आहे. आपल्याला सापेक्ष जगतात वावरायची केवळ सवयच आहे असे नव्हे तर, फक्त नाम रुपात्मक सापेक्ष जगच आपल्या इंद्रियाना आकळते. सापेक्षता ही वस्तुमान (Matter) काळ (Time) अवकाश (Space) व शक्ति (Energy) ह्या चौकटीमध्ये असते. ह्या जगताच्या म्हणजे जे Space, time, mass and Energy ह्या मध्ये बंदिस्त आहे अशा जगतातील आपल्या बुद्धिला ह्या शिवाय केवळ अस्तित्व असू शकते हे आकळत नाही. Spacelessness, timelessness, masslessness असे तत्त्व म्हणजे ब्रह्मतत्त्व. ऋषींच्या भाषेत अवकाश रहीत - पंचमहाभूतांच्या पलीकडे गुणातीत, कालातीत - तिन्ही काळाच्या पलिकडे देहातीत असे जे काही आहे ते ब्रह्मतत्त्व होय.

आता ऋषी काळाच्या पलीकडे म्हणतात.

काळ म्हणजे दोन घटने मधील अंतर

Time is distance between two events.

ही भौतिक शास्त्राची व्याख्या. साध्या भाषेत सांगायचे तर ज्यावेळी हालचाल होते तेव्हा काळ उत्पन्न होतो. एक वस्तू दुसरीकडे जाते तेव्हा काळ उत्पन्न होतो. पृथ्वी फिरते म्हणून दिवस रात्र संभवतात.

पण परमतत्त्व हे एकच आहे सर्वत्र तेच आहे त्यामध्ये अंतर नाही. ते एकटे असल्याने ते इकडे तिकडे हलत नाही. म्हणून काळ त्यामध्ये निर्माण होत नाही.

वरील विवेचनाचा आधार घेऊन सापेक्ष जगत म्हणजे माया, सृष्टी किंवा संसार व निरपेक्ष जगत म्हणजे परमतत्त्व म्हणजे गजानन ह्या मधील फरकाचा अंदाज घेऊन गजाननाचे तत्त्व समजून घेता येईल. आतापर्यंतच्या विवेचनावरून समजून येते की गजाननाचे हे निर्गुण निराकार स्वरुप बुद्धिच्या आवाक्या पलिकडचे आहे.

## 'त्वम् मूलाधार स्थितोऽसि नित्यम्'
## त्वम् शक्ति त्रयात्मका
## 'त्वाम् योगिनो ध्यायन्ति नित्यम्'

**भावार्थ :** तू मूलाधार चक्रामध्ये स्थित आहेस.

तू इच्छाशक्ति ज्ञानशक्ति व क्रियाशक्ति ह्याने युक्त आहेस.

योगी तुझे (असे) ध्यान करतात.

**विवेचन :** जगताची उत्पत्ति करण्याआधी जी इच्छा लागते, ती एक शक्ति किंवा अभिव्यक्ति आहे. जे तयार करायचे त्याचे ज्ञान लागते व ते करण्याची कुवत लागते. ह्या सर्व शक्त्या केवळ परम तत्त्वाच्या असतात. प्रत्येक सजीवात देखील ह्या तीनही शक्तींची अभिव्यक्ति कमी अधिक प्रमाणात दिसते. साधकाने लक्षात ठेवायचे की जे काही माझ्याकडून केले जाते ते सर्व त्या परमतत्त्वाचे सामर्थ्य आहे.

मूलाधार नाडीमध्ये ही शक्ति वास करते तेथून सर्व कार्यांचे संचालन करते. योगाभ्यास हा स्वतंत्र विषय आहे. योगी त्या शक्तिचे म्हणजे कुंडलीनीचे उत्थापन करून मुक्ति मिळवतात. हा विषय गुरुकडून शिकावयाचा आहे. फक्त एवढेच लक्षात घ्यावे. योग मार्गाने त्या परमतत्त्वापर्यंत पोहचता येते.

**त्वम् ब्रह्मा त्वम् विष्णूः त्वम् रूद्रः त्वम् इंद्रः**
**त्वम् अग्निः त्वम् वायुः त्वम् सूर्यः त्वम चंद्रमाः**
**त्वम् ब्रह्म, भूः भुवः स्वरोम्**

**भावार्थ :** तूच ब्रह्मा, विष्णू, महेश व इंद्र आहेस तूच अग्नि, वायु, सुर्य, चंद्रमा आहेस. (वास्तविक तु) ब्रह्म (परमतत्त्व आहेस) तू पृथ्वी लोक, अंतरिक्ष लोक व स्वर्ग लोक आहेस.

**विवेचन :** ऋषी गजाननाचे समष्टी रूप सांगतात. साधकाने सोयीसाठी पार्थिव गजाननाची आराधना जरूर करावी पण त्याच बरोबर त्याचे खरे स्वरुप ब्रह्मस्वरुप आहे जो निर्गुण, निराकार, कालातीत, स्थलातील सत् चित् आनंद स्वरुप आहे हे भान सतत ठेवावे. सर्व चराचरात् तोच व तोच भरून आहे इतकेच नव्हे तर मी देखील तोच आहे अशी भावना करावी. वर सांगितलेल्या 'विभूत्या' ठळक ठळक अशा आहेत त्यांच्या स्मरणाने अंत:करण विश्वाकार करावे. विराट रुपाचे भान हाच खरा भक्ति योग आहे. अनेकत्वामध्ये एकत्व बघणे हीच आपले स्व-रुप जाणण्याची प्रक्रिया आहे.

**गणादिं पूर्वम् उच्चार्य वर्णादिं तदनंतरं**
**अनुस्वारः परतरः अर्न्धेन्दुलसितम्**
**तारेणऋद्धम् एतत् तव मनुस्वरुपम्'**

**भावार्थ :** गण ह्या शब्दाचा प्रारंभीचा वर्ण 'ग्' प्रथम उच्चारावा.

त्यानंतर प्रथम वर्ण 'अ' (त्यामध्ये मिसळून) उच्चारावा म्हणजे ग् + अ = ग असा शब्द तयार होईल.

त्यानंतर अनुस्वाराचे उच्चारण करावे. म्हणजे 'गँ' असे उच्चारण होईल.

ह्या गँ ला अर्धचंद्रांकित ॐ काराने सुशोभित करावे म्हणजे ॐ गँ असा बीज मंत्र तयार होतो.

ह्या सर्वांचा एकत्रित प्रभाव म्हणजे हे तुझे सगुण साकार रुप होय.

**विवेचन :** गणेश तत्त्वाची उपासना करण्याकरता हा मंत्र उपयुक्त आहे.

भगवत्गीतेमध्ये देखील सांगतात यज्ञामध्ये मी जप यज्ञ आहे. इतर यज्ञासाठी बरीच खटाटोप करावी लागते व फळ देखील निश्चित नसते. पण जप किंवा नामस्मरणाचे फळ त्वरीत मिळते.

**गकारः पूर्वरूपं अकारः मध्यम रूपम्**
**अनुस्वारः अन्त्य रूपम् बिंदु उत्तररूपम्**
**नाद संधानम् संहिता संधिः**

**भावार्थ :** ग प्रथम अ मध्ये व अनुस्वार शेवट व अनुस्वारापुढे बिंदु असे चिन्ह या सर्वांचे एकत्रिकरण म्हणजे ओम्कार नाद व गँ हाच बीज मंत्र उच्चारणे.

**विवेचन :** ओंकार आकारास कसा येतो?

एक चिंतन :


ब्रह्माचे प्रतिक म्हणून ऋषीना ॐ कसा सुचला. त्या मागे विज्ञान आहे.

(अधिक माहितीसाठी डॉ. प. वि. वर्तक यांचे "उपनिषदांचे विज्ञाननिष्ठ निरूपण" हे पुस्तक वाचावे.)

विश्वाच्या उत्पत्तीच्या आधी काहीच नव्हते. केवळ ते एकच तत्त्व होते.

मग एक आभू म्हणजे मूलतत्त्वाचा गोळा झाला तो अव्यक्त होता (Black hole?) तेच महद् तत्त्व किंवा शिव तत्त्व. ते बिंदुसारखे होते त्या आभूमध्ये सर्व विश्वाचे वस्तुमान होते. जर एका मोहरीच्या दाण्यामध्ये सर्व विश्व कोंबले तर त्यामध्ये प्रचंड गुरुत्वाकर्षण असते त्यामुळे प्रचंड उष्णता निर्माण झाली व स्फोट झाला व त्यामधून वस्तु (Matter) बाहेर फेकली गेली त्यातून अनेकत्त्वाचे जगत् तयार झाले.

पॅटर्न १




आभूमधून वस्तुमान बाहेर फेकले गेले ते Centrifugal force मुळे Tangential गेले. आभुमध्ये प्रचंड गुरुत्वाकर्षण असल्याने ते वस्तुमान पुन्हा मागे वळले व ग च्या आकाराचे झाले. आकृतीमध्ये फक्त चार ग दाखविले आहेत. वास्तविक ज्यावेळी स्फोट होतो तेव्हा अनेक Forces त्यावर असतात व कोणता पॅटर्न होईल हे नेमके सांगणे कठीण असते.

सर्व सामान्यपणे वस्तुमान जेव्हा कमी असते तेव्हा त्यामध्ये स्फोट झाला तर त्यामधील मॅटर दूर फेकले जाऊन स्वतंत्र होते/वेगळे होते. जसे सूर्यापासून ग्रह तयार झाले. पण आभू (Black hole?) हा प्रचंड वस्तुमानाचा एक अगदी लहान आकार असल्याने त्यामध्ये प्रचंड गुरुत्वाकर्षण असते व त्यामधून काहीही निसटू शकत नाही.

पॅटर्न २




गकार प्रथम झाला. त्याचे कारण प्रचंड स्फोट व Centifugal force मुळे झालेला कंस व मग परत गुरुत्वाकर्षणाने कंसाचे टोक मागे वळून ग झाला हे आपण मागच्या आकृतीमध्ये बघितले.

ग झाल्यावर Centifugal force कमी झाला व नंतर मागील गुरुत्वाकर्षण व प्राप्त झालेली गतिमानता (Newton First law) ह्या दोनाचे संतुलन होईपर्यंत वस्तुपुढे वळसा घालून गेली व जेव्हा गुरुत्वाकर्षणाचा जोर वाढला तेव्हा पुन्हा उलटा कंस झाला व वस्तु परत मागे येऊ लागली व अ कार झाला.


पॅटर्न ३



आता मूळ आभू जो पूर्णपणे अव्यक्त आहे तो वेगळा वर राहिला व 'अ'कार खाली आला. अकाराच्या मधून पुन्हा Matter बाहेर जाऊन पुन्हा एक आडवा ग कार झाला पण हा ग आडवा असल्याने त्याला ऊ कार म्हटले आहे.


ह्या अ ह्या पॅटर्न मधून पुढे सर्व विश्व तयार होते. अ हा वैश्वानर किंवा विराट आहे. ते दृश्य जगताचे स्व-रुप आहे. हाच गजानन आहे. तो विराट आहे. गजानन आद्य आहे. हे पॅटर्न एका समतळात (co-planer) काढलेत पण वस्तुतः ही प्रक्रिया त्रिमितिमध्ये झाली व ऋषींना गजाननाचे जे रूप दिसले ते आजच्या गजाननाच्या मूर्तीसारखे असावे.

**पॅटर्न ४**




आता मकार म्हणजे अनुस्वार व बिंदु याचे स्वरूप बघु.

खरं तर हा सर्वात प्रथम तयार होतो तोच मकार किंवा शिव किंवा अव्यक्त किंवा ओंकारेश्वर किंवा गजाननाचा पिता आहे.




मूळ अव्यक्त आभू ह्यातून वस्तुमान (Matter) बाहेर फेकल्यामुळे प्रथम कंस (चंद्रकोर) तयार झाला तो कंस व मूळ आभू मिळून मकार ँ तयार होतो. हे शिवाचे प्रतीक आहे.

मकार-महेश व ह्या महेशातून अकार म्हणजे गजानन उत्पन्न होतो.

प्रथम परमतत्व जे निराकार, निर्विकार, निरपेक्ष (Absolute) आहे त्यावर एक आभू अव्यक्त तत्त्व / महद् तत्त्व भासमान होते.

आभू पासून 'ँ', मकार, महेश तयार होतो महेशानंतर ॐ गजानन तयार होतो. व पूर्ण ओंकार हे परब्रह्म व विश्वाचे निर्देशन करते. ज्ञानेश्वर माऊलीनी हाच भाव प्रकट केला आहे.

मकार महामंडल मस्तकाकारे



उकार उदर विशाल

अकार चरण युगुल

ते तिन्ही एकवटले तेथे शब्द ब्रह्म कवळले
ते मिया गुरू कृपे नमिले आदिबीज

ज्ञानेश्वरी अ . 1

**अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल**
**मकार महामंडळ । मस्तकाकारे ।।**
**ते तिन्ही एकवटले । तेथे शब्द ब्रह्म कवळले ।**
**ते मिया गुरुकृपा नमिले । आदिबीज (ज्ञानेश्वरी अ.१- १९/२०)**

भौतिक शास्त्राच्या मागोव्याने ॐ समजून घेण्याचा हा एक अल्प प्रयत्न आहे हा प्रयत्न केवळ उच्च शिक्षा विभूषित व शास्त्र मानणारे आहेत त्यांची श्रद्धा दृढ व्हावी म्हणून केला आहे. तसेच भौतिक शास्त्रे देखील शेवटी 'सत्याचे' शोधन करतात हे जाणवते. त्याच बरोबर भौतिक शास्त्रे ही बुद्धिच्या प्रांतात येत असल्याने त्यांना मर्यादा आहे त्यामुळे सत्याचे दर्शन केवळ सद्‌गुरुमुळे होते हे भान असावे.

## सैषा गणेश विद्या ।। गणक ऋषिः ।।
## निचृद् गायत्री छन्दः ।। गणपतिः देवता ।।
## ॐ गं गणपतये नमः ।।

**भावार्थ :** ही श्री गजाननाचे ज्ञान प्राप्त करून देणारी विद्या आहे. ह्या विद्येचा 'गणक' ऋषी हा द्रष्टा आहे. निचृद् गायत्री हा छंद आहे.

'ॐ गं' ह्या बीज मंत्र स्वरूप गजाननास माझा नमस्कार असो.

**विवेचन :** ऋषी स्वत:कडे ह्या वाङ्मयाचे कर्तृत्व घेत नाहीत. गणक ऋषी स्वत: गजानन ह्या विद्येचे कर्ते आहेत असे सांगतात.

हे स्तोत्र गायत्री छंदात बांधले आहे.

## एकदंताय विद्महे वक्रतुंडाय धीमहि तन्नो दंती प्रचोदयाऽत्

**भावार्थ :** आम्ही एकदंतास जाणतो. वक्रतुंडाचे चिंतन करतो तो दंती आम्हास प्रेरणा देवो.

**विवेचन :** येथे हा मंत्र म्हणताना आम्ही आता गजाननाला जाणतो हा भाव आहे. आतापर्यंत ऋषीनी अत्यंत स्पष्टपणे गजाननाचे मूळ स्वरुप कसे आहे हे सांगितले तसेच जीव व गजानन ह्यांचा परस्पर संबंध सांगितला. गजाननापासून सर्व विश्व तयार होते हे सांगून विराट स्वरुपाचे वर्णन केले ही सर्व माहिती आता मला झाली. मी त्याचे बीज मंत्राद्वारे ध्यान करतो जेणेकरून मला प्राप्त झालेल्या माहितीची प्रचिती येईल. गजाननतत्त्वाची अनुभूति येईल. असे करण्यास व होण्यास त्याच गजाननाची पुन्हा प्रार्थना केली आहे.

एकदंत म्हणजे मायेचा स्वामी व वक्रतुंड म्हणजे दुष्कृताचा नाश करणारा असा गजानन मला सतत ध्यान करण्याची प्रेरणा देवो व ध्यानाद्वारे त्याचे रूप मला अनुभवास येवो.

ह्या मंत्राच्या जपानंतर ऋषी गजाननाचे सगुण रूप वैभव रेखाटत आहेत.

**एकदंतं चतुर्हस्तं पाशम् अंकुशधारिणम् ।।**

**र दं च वरदं हस्तैः बिभ्राणं मूषकध्वजम् ।।**

**भावार्थ :** गजाननाला एकच (उजवा) दात आहे. त्याला चार हात आहेत. वरील उजव्या हातात पाश आहे व वरील डाव्या हातात अंकुश आहे. खालील डाव्या हातात हत्तीचा दात आहे तर उजव्या हाताने वर मुद्रा धारण करून तो जणू काही म्हणतो आहे कि भिऊ नकोस. तुझे मंगल क्षेम होईल तुला ज्ञान व ऐश्वर्य प्राप्त होऊन माझे दर्शन होईल असा आशीर्वाद देत आहे त्याच्या ध्वजावर मूषकाचे चिन्ह आहे. ही ज्ञान पताका आहे.

**रक्तं लंबोदरम् शूर्प कर्णकम् रक्तवाससम् ।।**

**रक्त गंधानुलिप्तांगं रक्तपुष्पैः सुपुजितम् ।।**

**भावार्थ :** सिंदुर चर्चित असे त्याचे विशाल उदर आहे. सुपासारखे विशाल कान आहेत. रक्तचंदनाची उटी सर्वांगास लावली आहे. तांबड्या फुलांनी त्याचे पूजन केले आहे.

**विवेचन :** मनाने इष्ट देवतेचे ध्यान हा प्रत्येक साधकाचा व्यक्तिगत व खाजगी भाग आहे. ध्यानाच्या सोयीसाठी ऋषी आपल्याला सर्वसाधारण आराखडा सर्वसाधारण रूपरेषा देत आहेत. त्याच्या चौकटीत ध्यान कर्त्याने आपल्या इष्ट देवतेस आपल्या रूचीप्रमाणे सजवावे.

**भक्तानुकम्पिनं देवं जगत्कारणमच्युतम् ।।**

**आविर्भूतं च सृष्टयादौ प्रकृते पुरुषात् परम् ।।**

**एवम् ध्यायति यो नित्यं सः योगिनां वरः ।।**

**भावार्थ :** जगताच्या निर्माता असलेल्या ह्या गजाननाची ह्या भक्तांवर अनुकंपा असते.

गोचर सृष्टीच्या पूर्वी असलेले, पुरुष व प्रकृती ह्याच्याही पलिकडचे /श्रेष्ठ असे परब्रह्म हे गजाननाचे खरे स्वरुप आहे, जो ध्यान करतो तोच योगियामध्ये श्रेष्ठ होय.

**विवेचन :** लक्षात घ्यावे ऋषीनी गजाननाचे वर्णन त्वम् एव प्रत्यक्ष तत्त्वम् अपि तू परब्रह्म स्वरुप आहेस असे केले व शेवटी देखील हेच सांगत आहेत. गजाननाचे खरे स्वरुप परमतत्त्व, परब्रह्म जे निरपेक्ष (Absolute) निर्विकार, निराकार, सत् चित् आनंद स्वरुप आहे. त्या निर्गुणातून सृष्टीचा उगम झाला. साधकाला निर्गुण रूपाची भक्ति/ उपासना करता येत नाही म्हणून सगुण साकार अशा गजानन विग्रहाचे वर्णन उपनिषद करते.

भक्ति विग्रहाची करावी पण भान हे मूळ परमतत्त्वाचे असावे हा ऋषींचा अभिप्राय आहे.

अशाप्रकारे ऋषी गजानन स्वरुपाचे ज्ञान देतात गजाननाचा बीज मंत्र सांगतात त्याचे सगुण ध्यान कसे करावे हे सांगून परमतत्त्वाचे भान ठेवावे व गणपतीची उपासना करावी सांगून गणपतीची आठ नावे घेऊन त्यांना नमन करून ह्या उपनिषदाची समाप्ति करतात.

## ।। नमो व्रातपतये ।।

**भावार्थ :** सर्व देवांच्या पतीला नमस्कार असो.

**विवेचन :** व्रात म्हणजे सर्व जगाचा समुच्चय. इदम् विश्वम् चा अधिपति तो व्रातपति

## ।। नमो गणपतये ।।

**भावार्थ :** गणांचा पति ह्याला नमस्कार असो.

**विवेचन :** गण म्हणजे गण्य गणना करण्याजोगे त्यांचा पति म्हणजे अगण्य असा गणपति.

## ।। नमः प्रमथ पतये ।।

**भावार्थ :** शंकराचे गण प्रमथ ह्यांच्या मुख्याला नमस्कार

**विवेचन :** प्र + मथ मथ म्हणजे घुसळणे किंवा पीडा. सर्व पीडांचा नाश करणारा प्रमथ पति. जगाचि उत्पत्ति मूळ वस्तूच्या घुसळण्याच्या प्रक्रियेतून झाली म्हणून त्याला प्रमथ पती म्हणणे योग्य होईल.

## ।। नमस्ते अस्तु लंबोदराय ।।

**भावार्थ :** लंबोदरास माझा नमस्कार असो.

**विवेचन :** हे उदर अकार स्वरुप आहे व ह्या अकारातून सर्व विश्वाची उत्पत्ति होते म्हणून लंबोदरात सर्व विश्व सामावले आहे.

## ।। एकदन्ताय नमः ।।

**भावार्थ :** एकदन्त असलेल्यास माझा नमस्कार

**विवेचन :** एक याचा अर्थ माया व दन्त म्हणजे सत्ता. मायेवर सत्ता गाजवणाऱ्या माया पतीस नमस्कार

## ।। विघ्ननाशिने नमः ।।

**भावार्थ :** जो सर्व विघ्नांचे हरण करतो व भक्तांना अभय देतो, त्याला नमस्कार.

## ।। शिवसुताय नमः ।।

**भावार्थ :** शंकराच्या पुत्राला नमस्कार

**विवेचन :** शंकर म्हणजे महेश तत्त्व महद् जे अभिव्यक्त नसते. त्या पासून सुत पुत्र म्हणजे (Extension) प्रगट अशा व्यक्त गजानन याला माझा नमस्कार.

## ।। वरदमूर्तये नमः ।।

**भावार्थ :** सर्वात शेवटी मंगल मूर्ति सर्व क्षेम कुशल करणारा अभय देणारा व इतर अनेक शुभ हितकारी वरदान देणाऱ्या अशा श्रीगजाननास माझा नमस्कार.

## ।। उपसंहार ।।

ह्या नंतर फलश्रुति येते. त्यावर विशेष चिंतन केलेले नाही. तरी पण जे फळ मिळते ते कर्मानुसार असते व ते मिळतेच. फळाचे नियोजन करणारा श्रीगजानन आहे. त्याची भक्तावर अनुकंपा असते. त्याच्या समष्ठी रुपाचे भान ठेवून असे मागणे मागतो की, हे गजानना तुझ्या कृपेने

**''सर्व प्राणिमात्र सुखी होवोत, सर्व प्राणिमात्र शरीर मन बुद्धीने निरोगी होवोत**
**तुझी कृपादृष्टी सर्वांवर असावी, सर्वांच्या क्लेशाच तू हरण करावे**
**सर्व चराचरात शांती, समृद्धी व समतोल रहावा व सर्व प्राणीमात्रांत परस्परात प्रेम भावना व मैत्री असावी.''**

श्री सद्गुरु स्वामीजी चिन्मयानंद महाराज यांच्या कृपेने गजाननाची कृपा झाली व त्याचे फळ हे 'चिंतन'. सद्गुरुचरणी अर्पण.

**- चिन्मय मिशन साधक**